श्री.विद्यासागर कानडे, माजी लोक आयुक्त / अध्यक्ष, लोक आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांच्या लोक आयुक्त / अध्यक्ष पदाचा कालावधी संपुष्टात येण्याच्या दिनांकाला त्यांच्या रजेच्या खाती शिल्लक असलेल्या अर्धवेतनी रजेचे पूर्णवेतनी रजेत रुपांतर करुन रजेचे रोखीकरण करण्यास मंजूरी देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्र.:- एलपीएल -२०२६/प्र.क्र.७०/लोकआ
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- १४ ऑक्टोबर, २०२६.

वाचा :- १. प्रबंधक, लोक आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांचे पत्र क्र.आस्था/लोआ/न्या.वि.मु.का./रजारोखीकरण /२०२६/१०११/१९३८९/२०२६, दि.२९.०९.२०२६.
२. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.एलपीएल १००४/६९०/प्र.क्र.६९/२००४/१५, दि.१४/०९/२०११.
३. महाराष्ट्र लोक आयुक्त अधिनियम, २०२३

**शासन निर्णय :-**

मा.श्री.विद्यासागर कानडे, माजी लोक आयुक्त/अध्यक्ष, लोक आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांचा लोक आयुक्त/अध्यक्ष पदाचा कालावधी दि.१९.०८.२०२६ (म.नं.) रोजी संपुष्टात आला. या दिनांकाला त्यांच्या रजेच्या खाती एकूण ४५६.५० दिवस इतक्या अर्धवेतनी रजा असून, त्या रजेचे पूर्ण भत्त्यांवरील रजेत रुपांतरीत केल्यास २२८.२५ दिवस पूर्णवेतनी रजा शिल्लक आहेत. सदर शिल्लक रजेच्या रोखीकरणाबाबतचे आदेश निर्गमित करण्याबाबत प्रबंधक, लोक आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांनी संदर्भ क्र.१ येथील पत्रान्वये विनंती केली आहे.

२. राज्यात दिनांक १५.०८.२०२६ पासून महाराष्ट्र लोक आयुक्त अधिनियम, २०२३ लागू झाला आहे. या अधिनियमातील कलम ३ (६) नुसार मा.श्री.विद्यासागर कानडे यांनी या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी ज्या अटी व शर्तींवर त्यांची नियुक्ती केली होती त्याच अटी व शर्तींवर, त्यांचा पदावधी पूर्ण होईपर्यंत लोक आयुक्त संस्थेचे अध्यक्ष पद धारण केले. यास्तव,

मा.श्री.विद्यासागर कानडे यांच्या सेवानिवृत्तीनंतर त्यांच्या खाती जमा असलेल्या अर्जित रजेचे रोखीकरण हे महाराष्ट्र लोक आयुक्त (सेवेच्या शर्ती) नियम, १९७३ मध्ये असलेल्या रजेच्या तरतूदीनुसार करण्यात येत आहे. महाराष्ट्र लोक आयुक्त (सेवेच्या शर्ती) नियम, १९७३ च्या नियम ६ अनुसार लोक आयुक्त यांना उच्च न्यायालयाचे न्यायाधीश (सेवेच्या शर्ती) अधिनियम, १९५४ व त्याखाली करण्यात आलेल्या नियमांच्या तरतुदीनुसार उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशाला लागू असलेली रजा अनुज्ञेय आहे. उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांचा रजा लेखा हा अर्धवेतनी रजेच्या स्वरुपात ठेवण्यात येतो. त्यानुसार सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दिनांक १४/०९/२०११ अन्वये श्री.वि.प.टिपणीस, माजी लोक आयुक्त यांच्या प्रकरणी फक्त अर्धवेतनी रजेच्या रोखीकरणास मंजूरी देण्याबाबतचा निर्णय झालेला आहे.

३. त्या अनुषंगाने श्री.विद्यासागर कानडे, माजी लोक आयुक्त/अध्यक्ष यांना त्यांच्या खाती शिल्लक असलेल्या ४५६.५० दिवस अर्धवेतनी रजेचे पूर्ण वेतनी रजेत रुपांतर करुन एकूण २२८ दिवस पूर्णवेतनी रजेचे रोखीकरण करण्यास शासन मंजूरी देत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६१०१४१५५७४७६७०७ असा आहे. सदर शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

NEETA EKNATH SHINDE

Digitally signed by NEETA EKNATH SHINDE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GAD, 2.5.4.20=F2BFFD6992498E56663024368C72B33364CFB066D53682C53A425E54D187A7C1, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=F325D659F47933958AA2D98F394DB95F94BE57548776492BA36E77EA1C4AA53B, cn=NEETA EKNATH SHINDE
Date: 2026.10.14 15:58:45 +05'30'

**( निता शिंदे )**
**उप सचिव , महाराष्ट्र शासन.**

**प्रत,**

१. मा.श्री.विद्यासागर कानडे, माजी लोक आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. प्रबंधक, लोक आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय, नवीन प्रशासकीय भवन, पहिला मजला, मादाम कामा मार्ग, मुंबई-४०० ०३२.
३. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
४. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
५. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
६. महालेखापाल (लेखा परीक्षा)-१, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
७. निवड नस्ती.